


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३६३, गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# माझ्या आयुष्यातील ही शेवटची निवडणूक!

## ■ काशिनाथ दाते यांचे भावनिक आवाहन ■ दैठणे गुंजाळ येथील खंडोबा मंदिरात फुटला प्रचाराचा नारळ

दैठणे गुंजाळ : विशेष प्रतिनिधी

**आजपर्यंत मी स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारातील छोटया मोठया १९-२० निवडणूका लढविल्या. काही निवडणूकांमध्ये विजय झाला, काहींमध्ये पराभवही झाला. मात्र मी थकलो नाही, थांबलो नाही. लोकांसाठी काम सुरूच ठेवले. माझ्या आयुष्याचा शेवट या निवडणूकीने होणार असल्याचे सांगत या निवडणूकीत आपल्या पाठीशी उभे राहण्याचे भावनीक आवाहन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी केले.**

दाते यांच्या प्रचाराचा शुभारंभ दैठणे गुंजाळ येथील खंडोबा मंदिरात जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर झालेल्या सभेमध्ये दाते यांनी आपल्या भावना मांडल्या.

दाते म्हणाले, गेली ४० वर्षे काम केल्याने लोकांमध्ये माझ्याविषयी सहानुभुती आहे. मी माझ्या आयुष्यात माझ्यासाठी कमी व दुसऱ्यांसाठी जास्त काम केलेले आहे. स्व.वसंतराव झावरे, विजयराव औटी यांच्या निवडणूकीचे मी स्वतः नियोजन केले. आज मात्र मी उमेदवार असल्याने नियोजनाची जबाबदारी माझ्या सहकाऱ्यांनी स्विकारावी असे आवाहन त्यांनी केले.

दाते पुढे म्हणाले, भाजपाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारासाठी आघाडीवर असून त्याचा मला अभिमान आहे. ही निवडणूक माझ्या आयुष्यातील शेवटची निवडणूक आहे. ४० वर्षे राजकारण करताना स्व यशवंतराव चव्हाण यांचा विचार घेउन मी काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर चालणारा मी कार्यकर्ता असल्याचे दाते यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी युवतीच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, सुजित झावरे, अशोक सावंत, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, अश्विनी थोरात, सुषमा रावडे, सुनील थोरात, शाम पिंपळे, दादाभाऊ चितळकर, दवेंद्र गावडे, अरूण होळकर, दिलीप भालसिंग, भाऊ भोर, सुभाष दुधाडे, बाबासाहेब खिलारी, राहुल शिंदे, बाळासाहेब लामखडे, विक्रमसिंह कळमकर, गणेश शेळके, डॉ. भाऊसाहेब खिलारी, अशोक चेडे, रामचंद्र मांडगे, शिवाजी खिलारी, किसन धुमाळ, लहू भालेकर, एकनाथ धुरपते, एकनाथ सोनवणे, बापूसाहेब गुंजाळ, ॲड. युवराज पाटील, दिनेश बाबर, संतोष गायकवाड, छबू कांडेकर, दत्ता पवार, दादाभाऊ वारे आदी उपास्थित होते.



■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचाराचा नारळ वाढविल्यानंतर झालेल्या सभेमध्ये दाते यांनी मार्गदर्शन केले.

### म्हणून सुजित झावरे तातडीने नगरकडे

ज्यांनी प्रचाराच्या शुभारंभाचा नारळ फोडला ते सुजित झावरे हे सभेतून निघून गेले. त्यांच्या आई सुप्रियाताई तथा माई यांना हृदयाचा त्रास झाल्याने त्यांना रूग्णालयात घेऊन जाण्यासाठी ते तातडीने नगरकडे रवाना झाले असून त्याचा वेगळा अर्थ लावण्यात येऊ नये.

काशिनाथ दाते
महायुतीचे उमेदवार

### विकासाच्या मुद्यावर निवडणूक

पाच वर्षापूव खोटी नाटी अश्वासने देण्यात आली. त्यावर मी बोलणार नाही. मला विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक न्यायची आहे. वसंतराव झावरे, विजय औटी यांच्या काळात विकास झाला. पाच वर्षात काय झाले ? एमआयडीसीचा उपयोग सर्वसामान्यांसाठी झाला पाहिजे, भुमिपुत्राला रोजगार मिळाला पाहिजे यासाठी माझी ही निवडणूक असल्याचे दाते म्हणाले.

### रखडलेले प्रश्न सोडविण्यासाठी बांधील

तालुक्यातील रखडलेले प्रश्न सोडविण्यासाठी मी बांधील असून तसा जाहिरनामा आम्ही प्रसिध्द केला आहे. जिथे काम केले तिथे प्रामाणिक काम केले. बाजार समितीला राज्यात नावलौकीक आहे ते काम माझ्याच नेतृत्वाखाली झाले. जिल्हा परिषदेमध्ये सभापती म्हणून काम करताना मी केवळ जिल्हा परिषदेच्या टाकळी गटात नाही तर संपूर्ण तालुक्यात काम केले. काम करताना पक्ष, गट तट पाहिले नाहीत गावागावात विकास कामे केली असल्याचे दाते यांनी सांगितले.

### अजितदादांचे आश्वासन पुर्ण करू

अजित पवार यांच्या उपस्थितीत कान्हूरपठार येथे पाणी परिषद झाली होती. पवार यांनी पारनेर तालुक्याचे हक्काचे पाणी देण्याचे आश्वासन दिले होते. ही योजना मोटारीचे बील कोण भरणार या मुद्यावर रखडली. आता प्रगत तंत्रज्ञान आले आहे. सोलरवर १०० अश्वशक्तीचे पंप चालतात. त्याचा वापर करून पठार भागावर पाणी आणण्यात येउन अजित पवार यांनी दिलेले आश्वासन पुर्ण केले जाईल असे आश्वासन दाते यांनी यावेळी दिले.

### १६ गाव योजनेसाठी मुळातून पाणी

१६ गाव पाणी योजना अनेक वर्षे टंचाईमध्ये ही योजना सुरू होते. मांडओहळचा पाणी साठा संपल्यानंतर ही योजना बंद होते. मुळा डॅममधून या योजनेसाठी पाणी आणण्याच्या योजनेला चालना देण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे दाते म्हणाले.

### दाते सर म्हणून माझी ओळख

काशिनाथ दाते व्यक्ती नगर तालुक्यात माहीती नसली दाते सर म्हणून नगर तालुक्यात माझी ओळख आहे. मी प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होत आलो आहे. मात्र माझी एकच चुक झाली की मी सोबत कॅमेरा घेऊन गेलो नसल्याची मिश्किलीही दाते यांनी केली.

### घाटमाथ्यावरील पाण्याची योजना मार्गी लावू

बाळासाहेब विखे यांच्या संकल्पनेतील सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर पडणारे पश्चिमेकडे वाहून जाणारे पावसाचे पाणी पूर्वेकडे सोडण्याची योजना आहे. ही योजना केंद्राकडे पोहचविण्यात आली असून आम्हाला ताकद दिली तर ही योजनाही मार्गी लावू.

काशिनाथ दाते
महायुतीचे उमेदवार

### कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही

गावागावात चाललेली भांडणे, ग्रामपंचायत, सोसायटयांमधील वाद थांबवायचे असतील तर तुम्ही मला सहकार्य करा. हे सगळे आपण थांबवू. ज्यावेळी माझ्यावर अन्याय झाला त्याला मी प्रतिकार केला आहे. इकडचा तिकडे गेलो नाही. मला संधी दिली तर या तालुक्यात नाहीशी झालेली शांतता पुन्हा प्रस्थापित करू. सुरु असलेला गोंधळ थांबवू. कोणत्याही कार्यकर्ता वाऱ्यावर सोडला जाणार नाही सर्वांना बरोबर घेऊन काम केले जाईल अशी ग्वाही दाते यांनी यावेळी दिली.

### घराघरांत प्रचार पोहचवा

अफवांवर विश्वास ठेऊ नका. कामाला लागा. प्रचाराची साधने पुरविली जातील. घराघरापर्यंत प्रचार पोहचला पाहिजे. लोकसभा निवडणूकीत आम्ही घराघरापर्यंत पोहचण्यात कमी पडलो ही चुक सुधारायची असल्याचे दाते म्हणाले.

### अजितदादा त्यांचे पुनर्वसन करणार

तालुक्यात गैरसमजाची राळ उडविली जात आहे. निवडणूकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर पारनेरची जागा राष्ट्रवादीकडे राहिली. पुढे वसंतराव झावरे यांच्या खांद्याला खांदा लाऊन काम करणारे काशिनाथ दाते यांनी पक्षासोबत काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सुजित झावरे, माधवराव लामखडे, विजय औटी हे देखील पक्षासोबत आले. सर्वेक्षणात ज्याला पसंती मिळेल त्यास उमेदवारी देण्याची ग्वाही अजित पवार यांनी दिला होती. त्यानुसार दाते यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. उर्वरीत इच्छुकांचे पुनर्वसन करण्याची ग्वाही दादांनी दिली आहे. दादांसमोर कोणालाही बळजबरीने नेण्यात आलेले नाही.

अशोक सावंत, जिल्हा राष्ट्रवादी

### घराघरांत प्रचार पोहचवा

अफवांवर विश्वास ठेऊ नका. कामाला लागा. प्रचाराची साधने पुरविली जातील. घराघरापर्यंत प्रचार पोहचला पाहिजे. लोकसभा निवडणूकीत आम्ही घराघरापर्यंत पोहचण्यात कमी पडलो ही चुक सुधारायची असल्याचे दाते म्हणाले.

### जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस

स्व वसंतराव झावरे यांचा आदर्श घेउन दाते यांची वाटचाल सुरू असून त्यांचे काम पाहून त्यांना अजित पवार यांनी संधी दिली आहे. पारनेर-नगरच्या परिवर्तनाची ही निवडणूक असून चांगल्या नेतत्वाला संधी म्हणून काशिनाथ दाते यांना संधी द्या.

विक्रमसिंह कळमकर
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस

### दाते यांना मोठया पदावर बसविण्यासाठी शिफारस करू

महाराष्ट्राची निवडणूक देशासाठी महत्वाची आहे. या निवडणूकीकडे जगभरातील जनतेचे लक्ष असून महायुती कशी जिंकते याकडे लक्ष आहे.महायुती सरकार स्थापन केले तर केंद्रातील सरकारही मजबूत होईल. त्यानंतर देशाचा जगात डंका वाजेल. केंद्रात नरेंद्र मोदी आल्यानंतर जगात भारताची इज्जत वाढली आहे. पूव लोकांनी गरीबीवर तीन तीन निवडणूका जिंकल्या. मोदींनी मात्र विविध योजनांद्वारे २२ लाख करोड रूपये खर्च करून गरीबांसाठी काम केले. दाते यांना विजयी केले तर महाराष्ट्रात महायुती येईल. महिला, शेतकरी, युवक यांचे कल्याण होईल. भारताला विश्वगुरूच्या स्थानावर बसविण्यासाठी महायुतीला विजयी करा. प्रत्येक बुथवर काम केले तर आपण लंका दहन केल्याशिवाय राहणार नाही. तम्ही हनुमान आहात मी जांबुवंतच्या भूमिकेत उभा आहे. तुम्ही लंका दहन करणार आहात. दाते यांना विजयी केले तर त्यांना मोठया पदावर बसविण्यासाठी मी केंद्राकडे शिफारस करणार आहे.

खा.अनिलकुमार जैन
महामंत्री भाजपा

### दाते नव्हे, अजितदादा उमेदवार

व्यासपीठावरील दिग्गज पाहीले तर दाते यांचा विजय निश्चित आहे. विरोधक अपप्रचार करतील. कार्यकर्त्यांनी सतर्क राहीले पाहिजे. दाते सर हे उमेदवार नसून स्वतः अजितदादा उमेदवार आहेत. अजित पवार यांचा शब्द ठाम असतो हे महाराष्ट्राला माहीती आहे. संन्याशाचे सोंग घेऊन कोणी वागणार असेल तर पारनेरकर त्यांना माफ करणार नाहीत.

संध्या सोनवणे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी युवती कॉंग्रेस

### संधीचे सोने करा

समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊ शकत जाणारे व्यक्तिमत्व अशी काशिनाथ दाते यांची ओळख आहे. आमदार म्हणून काम करण्याची संधी आपण त्यांना दिली पाहिजे. या संधीचे सोने केले पाहिजे. महायुतीने समाजातील सर्व घटकांना न्याय दिला असून राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा आणण्यासाठी काशिनाथ दाते यांनी मतदान करावे.

संदीप ठुबे
शिवसेना पदाधिकारी

### सुजित झावरे, डॉ. श्रीकांत पठारे यांनी मोठेपणा दाखविला

बुध्दीवाद्यांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या तालुक्यात गेल्या काही वर्षात वेगळे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. या निवडणूकीत सुसंस्कत, बुध्दीवादी उमेदवार लाभला असून सर्वांना बरोबर घेउन जाणारे हे नेतत्व आहे. सुजित झावरे, डॉ. श्रीकांत पठारे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून उमेदवारी मागे घेतली असून त्यांनी मनाचा मोठेपणा दाखविल्याबद्दल मी त्यांचे आभार माणतो. टाकळी ढोकेश्वर गटातून दाते यांना सर्वाधिक मतदान देणार आहोत.

डॉ. भाऊसाहेब खिलारी

### तर लाडकी बहिण योजना बंद होईल !

प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावामध्ये महायुती सरकारच्या योजना समजावून सांगितल्या पाहिजेत. लाडकी बहिण योजना बंद होणार नाही. मात्र दाते सरांना मतदान केले नाही तर योजना बंद होईल. केंद्रात महायुतीचे सरकार असून राज्यातही त्याच विचारांचे सरकार येणार आहे.

अरूण होळकर
मा. जि प सदस्य

### दिड महिन्यांपासून भाजपा कार्यकर्ते सक्रीय

उमेदवारी जाहिर होण्यास विलंब झाला. दाते यांच्या उमेदवारीनंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला. त्यांना तालुक्याचे प्रश्न माहीती आहेत. राजकारण करताना समाजाकरण डोळयापुढे ठेऊन त्यांनी काम केले. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच भाजपाचे कार्यकर्ते दिड महिन्यांपासून प्रचारात उतरले आहेत. बुथ कमिटयांच्या बैठका घेण्यात येऊन महायुतीचा उमेदवार विजयी करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे. तालुक्याच्या विकासासाठी महायुतीचा उमेदवार विजयी करावा लागेल. विरोधी उमेदवारांना ३ लाख ४६ हजार मतदारांमध्ये एकही लायक उमेदवार सापडला नाही का ? एकाच घरात दोन पदे कशासाठी ?

राहुल शिंदे, तालुकाध्यक्ष, भाजपा

### तुम्ही आरक्षण का दिले नाही ?

पाच वर्षात मराठा व धनगर आरक्षणाचे मुद्दे गाजले. विरोधांकडून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येते. मात्र गेली सत्तर वर्षात तुम्ही सत्तेत असताना आरक्षण का दिले नाही. आरक्षणाचा मुद्दा पुढे करून निवडणूकीत मते वळविण्याचा प्रयत्न होत आहे. निवडणूकीत हा मुद्दा आणणे योग्य नाही. आरक्षण हा घटनेच्या चौकटीतील अवघड विषय आहे.

दादाभाउ चितळकर
मा. अध्यक्ष, जिल्हा दुध संघ



# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटना



देशात अलीकडच्या काही वर्षांत अनेक लोकांनी डिजिटल आर्थिक व्यवहार सुरू केल्याचे चित्र आहे. याचाच गैरफायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम वाढल्याचे या सर्वेक्षण अहवालात म्हटले आहे. एफआयएस या नवनव्या तंत्रज्ञानावर आधारित आर्थिक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीच्या वतीने हा अहवाल नुकताच तयार करण्यात आला आहे. भारतीयांनी डिजिटल तंत्रज्ञानावर स्वार होऊन कॅशलेस आर्थिक व्यवहारांत वेग धरला असला, तरीही डिजिटल व्यवहार करताना कुठली काळजी घ्यावी, काय करावे आणि काय करू नये, स्वतःची खासगी माहिती गुप्त ठेवून फिशिंग मेलपासून स्वतःचे आर्थिक रक्षण कसे करावे, याबाबत मात्र त्यांच्यात पुरेशी जागृती झालेली नाही, असे या अहवालात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर बँकांची जबाबदारी वाढली असून, डिजिटल व्यवहारांसाठी त्यांनी ग्राहकांना अधिक सुरक्षित तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायला हवे; तसेच ग्राहकांना हे व्यवहार सुरक्षितपणे कसे करावेत, याचे प्रशिक्षणही द्यावे, अशी मागणी आता जोरकसपणे पुढे येताना दिसून येत आहे.

**एकीकडे देशातील डिजिटल आर्थिक व्यवहारांत वाढ होत चाललेली असतानाच दुसरीकडे ऑनलाइन आर्थिक गुन्हेगारीदेखील वेगाने वाढत असल्याचे धक्कादायक वास्तव एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. डिजिटल व्यवहारांतील अनेक उणीवांचा आणि त्रुटींचा फायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम तसेच लोकांची ऑनलाइन ओळख चोरून त्यांच्या नावाने आर्थिक गैरव्यवहार करण्याचे प्रकार (आयडेंटीटी थेप्ट) देशात वाढीला लागल्याचे दिसून आले आहे. चालू वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या सर्वेक्षणात म्हटले आहे.**



## अहवालातील महत्त्वपूर्ण निरीक्षणे

- २०२३ या वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या अहवालात म्हटले आहे.
- आर्थिक फसवणुकीचा फटका बसणाऱ्या लोकांपैकी ९६ टक्के लोकांना मोबाइल ॲपमधून बसला फटका.
- आर्थिक फसवणुकीचे सर्वाधिक बळी २७ ते ३७ या वयोगटातील.
- मोबाइल ॲपचा वाढता वापर, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक यात थेट संबंध.
- ऑनलाइन आर्थिक व्यवहारांच्याबाबत देशातील लोकांची जागृती गरजेची. बँकांचे ४१ टक्के व्यवहार आता होतात ॲपवरून.
- मोबाइल पेमेंट आता कॅश आणि कार्ड पेमेंटपेक्षाही वाढले.

## पासवर्ड असे ठेवा सेव्ह!

तुमचे सगळे पासवर्ड सुरक्षितरित्या सेव्ह करण्यासाठी काही ॲप्स मदत करतात, त्याविषयी...



- ब्लर : हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करण्याबरोबरच पासवर्ड तयार करण्यासाठी आणि ते ऑटो-फील करण्यासाठी सुद्धा वापरता येऊ शकतं. लॉग इन आणि पासवर्ड यामध्ये लॉग इन इन्फॉर्मेशन ॲड करता येते. ॲड केलेली माहिती नंतर कॉपी, एडीट आणि डिलीट करता येते. यामध्ये स्वतंत्र प्रायव्हेट ब्राऊजर उपलब्ध आहे जो वापरून एखाद्या वेबसाइटवर आपलं लॉग इन आणि पासवर्ड ऑटोफिल करता येतात. हे ॲप्लिकेशन आयओएस, ॲंड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध आहे.
- स्टिकी पासवर्ड : स्टिकी पासवर्ड ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्याची सुविधा देतं. हे ॲप्लिकेशन विंडोजसाठी असलेले क्रोम, क्रोमियम, फायरफॉक्स, थंडरबर्ड, इंटरनेट एक्सप्लोरर या ब्राऊजरवर तर ॲंड्रॉइडसाठी फायरफॉक्स, डॉल्फीन आणि यूसीवेब या ब्राऊजरवर आणि आयओएसवर सफारी या ब्राऊजरवर वापरता येतं. मॅकवर हे सफारी बरोबरच क्रोमवर सुद्धा वापरता येतं.
- डॅशलॅन : आयओएस, ॲंड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध असणारं हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्यास मदत करतं. जर आपण वापरात असलेली एखादी साइट सेक्युअर नसेल तर तसं सूचितही करतं. यामुळे संभाव्य धोका टळू शकतो. या ॲप्लिकेशनमध्ये अन्य ॲप्लिकेशन जसे की वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास यात सेव्ह केलेली माहिती इम्पोर्ट करण्याची सुविधा आहे. यात आपण सेव्ह केलेली माहिती फक्त आपल्या डिव्हाइसवर ठेवायचा पर्यायसुद्धा दिला गेला आहे.

### ही काळजी घ्या...

- ठरावीक कालावधीनंतर पासवर्ड बदला.
- पुन्हा तोच पासवर्ड ठेवणं टाळा.
- पासवर्डमध्ये नंबर, स्पेशल कॅरॅक्टर, कॅपिटल आणि स्मॉल लेटर्स ठेवून तो अधिक सुरक्षित करावा.
- अन्य कोणाशीही पासवर्ड शेअर करू नये.
- पासवर्डमध्ये आपली वैयक्तिक माहिती जसं की नाव, जन्मतारीख याचा वापर करणं टाळा.
- सगळ्या ठिकाणी एकच पासवर्ड वापरू नये.
- जर पासवर्ड कुठे स्टोअर केले असतील तर ते अन्य कोणाला सहज मिळणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- आठ ते बारा कॅरेक्टर्सचा पासवर्ड हा अधिक सुरक्षित मानला जातो.

- पासवर्ड बॉस : पासवर्ड सेव्ह करून ऑटोफिलची सुविधा देणारं हे ॲप्लिकेशन विंडोज, ॲंड्रॉइड, आयओएस यावरच उपलब्ध आहे. मॅक आणि लिन्युक्स यावर हे ॲप्लिकेशन उपलब्ध नाही. वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास हे डॅशलॅन बरोबरच क्रोम, इंटरनेट एक्सप्लोरर, फायरफॉक्स, ओपेरा आणि एज या ब्राऊजर्समधून सुद्धा लॉगिन माहिती यात इम्पोर्ट करता येते.

## ८४ टक्के लोक जोडीदाराशी शेअर करतात पासवर्ड!

आपण कितीही प्रायव्हसीच्या गोष्टी करत असलो तरी ८४ टक्के भारतीय त्यांचे पासवर्ड त्यांच्या जोडीदाराबरोबर शेअर करत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, सोशल मीडिया हे सगळं सध्याच्या जीवनशैलीचा एक भाग आहे. दोघांच्या नात्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत असून जोडीदाराबरोबर पासवर्ड शेअर करण्यात काहीच चुकीचं नसल्याचं अनेकांना वाटतयं. मॅक्फी संस्थेच्या एका अहवालातून ही बाब समोर झाली आहे. ६०० लोकांचा सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार, तंत्रज्ञानाचा वापर नात्याचा एक भाग असल्याचं मत ७७ टक्के लोकांनी व्यक्त केलं. नात्यात प्रायव्हसी महत्त्वाची असते, असं ६९ टक्के भारतीयांनी सांगितलं. ६७ टक्के तरुण मुला- मुलींना वाटतं की त्यांच्या जोडीदाराचं त्यांच्यापेक्षा इंटरनेटवरच जास्त लक्ष असतं. तर, ८१ टक्के भारतीयांच्या मते, त्यांचे मित्र व कुटुंबातील सदस्य त्यांच्या सोबत असतानाही मोबाइलमध्येच जास्त रमलेले असतात.

## कॅशलेस होताना...

**रोकडविरहित व्यवहारांची सोय होण्याऐवजी त्यामुळे ताण वाढतो आहे. कारण यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागत आहे. लोकांनी अधिकाधिक व्यवहार कॅशलेस करावेत यासाठी सरकारकडून काही सवलतीही देण्यात आल्या आहेत. कॅशलेस व्यवहारात संबंधित व्यक्तीने दिलेली ओळख चोरीला जाण्याची भीती आहे. मग कॅशलेसचे फायदे-तोटे नेमके कोणते आहेत, ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न...**

### कॅशलेसचे फायदे

- सुविधा : आर्थिक व्यवहार करण्यातील सुलभता हा कॅशलेस होण्यासाठी उद्युक्त करणारा सर्वात मोठा घटक आहे. प्रत्येक व्यवहारासाठी तुम्हाला रोकड घेऊन जाण्याची गरज नाही की एटीएममधून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही. प्रवासात कॅशलेस व्यवहार खूप उपयुक्त ठरतात. तुम्हाला कुठेही व कधीही यामुळे व्यवहार पूर्ण करणे सोपे जाते.




- सवलती : डिजटल प्रणालीने इंधन खरेदी केल्यास त्यावर ०.७५ टक्के सूट, रेल्वे तिकिटे, महामार्गाचा टोल, विमा खरेदी या सर्वांवर देण्यात येणारी सूट हादेखील त्याचाच एक भाग आहे. मोबाइल वॉलेट कंपन्यांनी दिलेल्या सवलती यांची यात भर पडली आहे.
- खर्चाचा मागोवा शक्य : सर्व व्यवहार नोंदवले जात असल्यामुळे खर्चाचा मागोवा घेणे लोकांना खूप सोपे जाणार आहे. याचा उपयोग आयकर विवरणपत्र भरताना तसेच आयकरविषयक चौकशीच्या वेळी होणार आहे. त्याचप्रमाणे महिन्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतानाही याचा उपयोग लोकांना होणार आहे.
- अंदाजपत्रकाला शिस्त : तुमच्या घरच्या मासिक अंदाजपत्रकाला शिस्त लागणार आहे. मोबाइल ॲप व टूल्स यामुळे लोकांना त्यांच्या खर्चाची पद्धत पाहणे शक्य होते, ज्यामुळे मागील काही वर्षांतील खर्चाचा आढावाही घेता येतो. खर्च नियंत्रित झाल्यास गुंतवणूक वाढवणे शक्य होते. अनावश्यक खर्चाला आळा घालणेही यामुळे शक्य होते.
- कमी जोखीम : चोरी झाल्यास तुम्हाला तुमचे कार्ड ब्लॉक करता येते किंवा मोबाइल वॉलेट ब्लॉक करता येते. परंतु रोकड चोरीला गेल्यास ती परत मिळणे दुरापास्त असते. याचा फायदा प्रवासादरम्यान होतो.
- छोटे फायदे : जेवढे बिल झाले असले तेवढीच रक्कम तुम्हाला (सुट्या पैशांत बिल झाले असले तरी) भरता येते. त्यामुळे दुकानदारांची सुटे पैसे देण्यातून सुटका होते.


### कॅशलेसचे तोटे

- ओळखचोरीची भीती : कॅशलेस व्यवहारांत ओळखचोरीची सर्वाधिक भीती असते. आपण कॅशलेस व्यवहारांना सरावलेले नसल्यामुळे फिशिंग मेल्सच्या जाळ्यात शिक्षित लोकही अलगद सापडतात. गैरप्रकार झाल्यास त्यावर कारवाई करण्यासाठी प्रभावी यंत्रणा आपल्याकडे नाही.



एखाद्या गरीब रिक्षावाल्याचा आधार क्रमांकच चोरीला गेला तर तो काय करणार? अशावेळी तपास यंत्रणा तोकडी असल्याचा फटका कॅशलेस व्यवहारांना बसू शकतो. याशिवाय बँकांच्या डेटाबेसमधून माहिती चोरीला गेल्यास त्याचाही फटका बसू शकतो.
- फोन हरवणे : कॅशलेस व्यवहारांसाठी केवळ मोबाइल फोनवरच अवलंबून राहणार असाल तर या फोनची चोरी झाल्यास तुम्हाला त्याचा मोठा फटका बसू शकतो. तुम्ही परदेशात असाल किंवा प्रवास करत असला आणि अशी घटना घडली तर त्यामुळे तुमची पंचाईत होऊ शकते. शिवाय तुम्हाला तुमचा फोन सतत चार्ज्ड ठेवावा लागतो. फोनची बॅटरी उतरल्यास तुम्हाला कॅशलेस व्यवहार करता येत नाहीत.
- तंत्रज्ञानाला न सरावलेल्यांसाठी अवघड : देशात केवळ ३४.८ टक्के इंटरनेटचा प्रसार झाला आहे. एकूण मोबाइल वापरकर्त्यांपैकी केवळ २६.३ टक्के लोकांकडे स्मार्टफोन आहेत. डिजिटल होण्यामध्ये मानसिकता न बदलणे ही मोठी समस्या आहे. याचा त्रास ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक होतो.
- अतिखर्च : प्रत्यक्ष रोकड खर्च करावी लागत नसल्याने खर्चात वाढ होऊ शकते. रोकड प्रत्यक्ष बाळगून खर्च करावी लागल्यास हातातून पैसे जात आहेत या कल्पनेनेच खर्चावर नियंत्रण येते. मात्र कार्डांनी किंवा मोबाइल वॉलेटने पैसे द्यावे लागल्यास जवळची रोकड जात नसल्याने अधिक खर्चाची प्रवृत्ती वाढीस लागण्याची भीती असते.

## इंटरनेट बँकिंगची सुविधा




**घरोघरी आज इंटरनेटचा वापर वाढला आहे. त्यामुळे जवळपास सर्वच बँकांनी इंटरनेटद्वारे बँकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नेटबँकिंगच्या सुविधेचा वापर करताना आपल्याकडून नजर चुकीने काही त्रुटी राहतात आणि सायबर चोरांकडून हॅकिंगसारखे प्रकार घडून आपणास नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे आपण नेटबँकिंग प्रणाली समजून घेऊ. आज सर्वच बँका आपापल्या नेटबँकिंग प्रणालीमध्ये ग्राहकांची व व्यवहाराची सुरक्षा व गोपनीयता राखण्यास प्राधान्य देतात. सर्वसाधारणपणे या सुविधेचा वापर करताना बँक तुमचे दोन गोपनीय पासवर्ड विचारते, म्हणजेच जोवर आपण हे दोन्ही पासवर्ड देत नाही तोवर व्यवहार पूर्ण होत नाहीच. त्याचप्रमाणे काही बँका अजून सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तुमच्या मोबाइलवर पासवर्ड पाठवून व्यवहार तुम्हीच करत आहात ना, याची खात्री करून घेते. सर्वात पहिला व महत्त्वाचा नियम म्हणजे, कुठलीही बँक व बँकेचा प्रतिनिधी फोन, ई-मेल व वैयक्तिकरित्या तुम्हास खात्याबद्दल व पासवर्डबद्दल विचारणा करत नाही. सर्वसाधारणपणे बरेचसे ग्राहक या जाळ्यात फसतात.**

### सुरक्षिततेसाठी काय कराल?

- बँकखात्याची माहिती कुणालाही अगदी बँकेलाही फोन, ई- मेल वा वैयक्तिकरित्या देऊ नका.
- पासवर्ड नियमितपणे दर १५ दिवसांनी बदलत राहा. पासवर्ड अतिशय कठीण पातळीचा ठेवा त्यात, शब्द अंक, विशेष चिन्हांचा वापर करा. बँकेची एसएमएस सुविधा सुरू ठेवा.
- बँकेचे व्यवहार सायबर कॅफेमधून न करता घरातील कम्प्युटरवर करा. बँकेचे संकेतस्थळ नीट पाहून टाइप करा. एचटीटीपीएस दिसत नसल्यास व्यवहार करू नका.

### प्रतिबंधक उपाय...

- सायबर विश्वातील बहुतेक आर्थिक गुन्हे पासवर्ड व लॉग इन आयडी चोरून घडतात. बऱ्याचशा एक्स्पर्ट कम्प्युटर वापरणाऱ्यांनासुद्धा त्यांच्या नकळत पासवर्ड व लॉग इन आयडी चोरला जाऊ शकतो याची नीटशी कल्पना नसते. बँक अशा प्रकारे घडलेल्या गुन्ह्यातील आर्थिक नुकसानीची जबाबदारी घेत नाहीत. काही बँका तुम्हाला दर दोन आठवड्यांनी तुमचा पासवर्ड बदलण्यास भाग पाडतात. हे सायबर गुन्हे टाळण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.



- आर्थिक व्यवहार करण्यासाठी संस्था अथवा बँका त्यांच्या अधिकृत संकेतस्थळाचा इंटरनेटवरचा पत्ता (यूआरएल) तुम्हाला पाठवते. तो पत्ता जर एचटीटीपी या शब्दाने चालू होत नसेल तर सावधान. एचटीटीपी या शब्दाने चालू होणारे इंटरनेटवरचे सर्व यूआरएल सुरक्षित नसतात. एचटीटीपी पत्ता असणाऱ्या संकेतस्थळावर तुम्ही टाइप केलेला सर्व मजकूर इंटरनेटला जोडलेली कुठलीही व्यक्ती थोड्या प्रयत्नांती वाचू शकते व त्या माहितीचा गैरवापर करू शकते.
- कम्प्युटर सुरक्षेच्यादृष्टीने कुठलीही महत्त्वाची माहिती चॅट करताना टाइप करू नका. उदा : क्रेडिट कार्ड नंबर, पॅनकार्ड नंबर, तुमची जन्मतारीख आदी. तुम्ही जर चॅट करताना मायक्रोफोन व वेब कॅमेरा वापरत असाल तर त्यामार्फत तुम्हाला नकळत तुमच्या हालचाली, फोनवरची बातचित, तुम्ही की-बोर्ड वरची कुठली बटने दाबलीत हे सायबर चोर प्रयत्नांती समजू शकतो. त्या माहितीचा उपयोग करून तुमचा पासवर्ड पण चोरला जाऊ शकतो. यावर सोपा उपाय म्हणून मायक्रोफोन व वेब कॅमेरा काम झाल्यावर बंद करा किंवा झाकून ठेवा.
- सध्या स्पायवेयरचा प्रसार प्रचंड वाढलाय. काही ई-मेल उघडल्यावर लगेचच तुमच्या कम्प्युटरमध्ये स्पायवेयर शिरू शकते. तसेच, काही गेम्स व प्रोग्रॅम्स डाउनलोड करताना पण स्पाय वेयर शिरू शकते. अशा विविध प्रकारांनी स्पाय वेअर तुमच्या नकळत तुमच्या कम्प्युटरमध्ये शिरतात आणि तुम्ही कम्प्युटरवर काय करता याची पूर्ण खबर ठेवतात. तुमची खासगी माहिती, पासवर्ड, कोणते प्रोग्रॅम वापरले, कुठल्या वेबसाइटना भेटी दिल्या ही माहिती सायबरचोरांच्या हाती लागू शकते. दोन किंवा तीन दिवसांनी कम्प्युटरच्या वापरामुळे जमा झालेली तात्पुरती डाउनलोडेड माहिती व जुनी वेब पेजेस कायमस्वरूपी काढून टाकत चला. कम्प्युटर आणि इंटरनेटचे फायदे पाहता कम्प्युटर न वापरणे हा पर्याय नसून काळजी घेतली तर या सायबर चोरांवर मात करणे अजिबात अवघड नाही.

### कसे कराल पैसे ट्रान्सफर?

#### नेटबँकिंगच्या मर्यादा

नेटबँकिंग हा बँकेकडून ग्राहकाला दिलेला आर्थिक व्यवहाराचा कॅशलेस पर्याय आहे. यामुळे कसलाही व्यवहार करण्यासाठी बँकेत जाण्याची गरज नाही. एका दिवस-ात कोणत्याही बँकेच्या ग्राहकाला एक रुपयापासून ते १० लाखापर्यंत पैसे पाठवता येऊ शकतात. यासाठी कोणताही अधिकचा कर लागत नाही. सध्या नेटबँकिंगचा वापर जवळपास २०० टक्क्यांनी वाढल्याचं बोललं जात आहे. नेट बँकिंग प्रक्रिया सर्व बँकांची थोड्या फार फरकाने सारखीच आहे.



कस्टमर आय.डी. आणि आयपिन मिळाल्यानंतर संबंधित बँकेच्या अधिकृत वेबपेजवर जावे. तिथे पहिल्यांदा कस्टमर आयडी टाकण्याचा पर्याय येईल. कस्टमर आयडी टाकल्यानंतर आयपिन टाकण्याचा पर्याय येईल. लॉग इन केल्यानंतर पहिल्यांदा खात्याचा तपशील दाखवला जाईल. बाजूलाच फंड ट्रान्सफर हा पर्याय दिलेला आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांच्या बँकेचा आयएफएससी कोड, बँक खाते नंबर आवश्यक आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी अगोदर बेनिफिशिअरी क्रमांक म्हणजे ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांचा तपशील तयार करणं गरजेचं आहे. फंड ट्रान्सफरमध्ये गेल्यानंतर बाजूलाच रिक्वेस्ट हा पर्याय आहे. त्यावर क्लिक केल्यानंतर ॲड बेनिफिशिअरी हा पर्याय दिसेल. त्यामध्ये ज्यांना पैसे पाठवायचे त्यांचा आयएफएससी कोड, खाते क्रमांक ही माहिती दिल्यानंतर पुढील स्टेपमध्ये जावे. खाते क्रमांक, आयएफएससी कोड टाकून पुढे गेल्यानंतर कन्फर्म करण्यापूर्वी तुमच्या रजिस्टर केलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. तो ओटीपी टाकून बेनिफिशिअरी तयार करावं. बेनिफिशिअरी तयार केल्यानंतर सरासरी ३० मिनिटांनंतर तुम्ही पैसे पाठवू शकता. ३० मिनिटांनंतर इतर बँकांना पैसे पाठवता येतील. त्याच बँकेच्या ग्राहकाला पैसे पाठवायचे असतील तर ट्रान्सफर विदिन बँक हा पर्याय निवडावा किंवा इतर बँकेच्या ग्राहकाला पैसे ट्रान्सफर करायचे असतील तर ट्रान्सफर टू ऑदर बँक हा पर्याय निवडावा. त्याच बँकेच्या ग्राहकालाच पैसे पाठवायचे असतील तर तीन स्टेपमध्ये पैसे पाठवता येतात. पहिल्या स्टेपमध्ये तुम्हाला सेव्हिंग किंवा करंट अकाऊंटमधून पैसे पाठवायचे आहेत, तो पर्याय निवडावा. त्यानंतर ट्रान्सफर नाऊ हा पर्याय निवडून तुम्ही ॲड केलेल्या बेनिफिशिअरीचा क्रमांक निवडावा. जेवढे पैसे पाठवायचे आहेत ती रक्कम टाकावी. त्यानंतर कन्फर्म करावं. कन्फर्म केल्यानंतर तुम्हाला खात्याशी कनेक्टेड मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. ओटीपी टाकल्यानंतर काही क्षणात पैसे ट्रान्सफर होतील.

#### या चुका करू नका...

कोणत्याही व्यक्तीसोबत आपला अकाउंट पासवर्ड शेअर करू नका. कोणत्याही अज्ञात लिंक किंवा अटॅचमेंटला ओपन करू नका. ऑनलाइन बँकिंगचा वापर केल्यानंतर त्याचे लॉगइन तसेच ठेवू नका. नेहमी लॉगआउट जरूर करा. आपली पर्सनल यूएसबी किंवा हार्ड डिस्कचा वापर कोणत्याही अन्य दुसऱ्या लॅपटॉप किंवा कम्प्युटरवरून करू नका. सोशल मीडियावर कधीही आपली जन्मतारीख, पत्ता, फोन नंबर यासारखी माहिती उघड करू नका. यावरून ऑनलाइन फ्रॉड होऊ शकतो.

पारनेर दर्शन


## शॉर्ट न्यूज

### आ. गडाख यांच्या प्रचाराचा शुभारंभ

■ **नेवासा :** महाविकास आघाडी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेवासा विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार आ. शंकरराव गडाख यांच्या प्रचाराचा नारळ वाढून शुभारंभ करण्यात आला. नेवासातील मळगंगादेवी, खोलेश्वर गणपती, नेवासा शहराचे ग्रामदैवत मोहिनीराज नारळ वाढून प्रचाराचा शुभारंभ करत नेवासा शहरात प्रचारार्थ रॅली काढण्यात आली. तर नेवासा शहरात फटाक्याची आतिषबाजी करत आ. गडाख यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यानिघालेल्या प्रचार रॅलीत आ. शंकरराव गडाख यांच्यासह विजय गडाख यांच्यासह उबाठा शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### भाकपाचा महाविकास आघाडीला पाठींबा

■ **नगर :** राज्यात शेतकरी, युवक, कामगार व शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेले गंभीर प्रश्न व मोठ्या प्रमाणात फोफावलेली असहिष्णुतेच्या विरोधात आवाज उठवून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सातत्याने आंदोलन करुन नागरिकांमध्ये जागृती केली. या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी बरोबर असलेले भाकप जिल्ह्यातील सर्व महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे काम करण्याचा निर्धार शहरात झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. शहरातील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयात बैठक पार पडली.

### निमगाव जाळीच्या शाळेतच झाली चोरी

■ **संगमनेर :** सणासुदीच्या काळात संगमनेर तालुक्यातील निमगावजाळी येथील जिल्हापरिषद शाळा आणि तळोले वस्तीवरील अंगणवाडीत भुरट्या चोरट्यांनी डल्ला मारल्याची घटना घडली आहे. त्यामुळे आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत संगीता शेलार यांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, २६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान जिल्हापरिषद शाळा आणि तळोले वस्तीवरील अंगणवाडीतून ११ हजार रुपये किंमतीचा कोरानिया कंपनीचा ३२ इंच स्मार्ट टिव्ही, दोनशे रुपये मसूरदाळ असा एकूण ११ हजार ९०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

### श्रीगोंद्यात शेतकऱ्याची फसवणूक

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील चिंभळा गावातील गरीब शेतकरी कारभारी धोंडिबा मदने यांची एका स्थानिक नेत्याने नोकरीचे आमिष दाखवून मोठ्या रक्कमेची फसवणूक केली आहे. मदने यांच्या मुलाने २०१५ साली डी. एडचे शिक्षण पूर्ण केले होते, याची माहिती मिळताच श्रीगोंदा तालुक्यातील नमुद नेत्याने मदने यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या शिक्षण संस्थेत मुलाला नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिलते. नेत्याच्या संपर्कानंतर मदने यांना शिक्षण संस्थेच्या संचालकाने बोलावून घेतले.

### अकोले मतदारसंघात बहुरंगी लढत

■ **अकोले :** अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या अकोले विधानसभा मतदारसंघात १२ पैकी ३ अपक्ष उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्याने ९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. दुसरीकडे आघाडी व युतीत बंडखोरी झाल्याने निवडणूक चुरस निर्माण झाली आहे. भाजपचे वैभव पिचड यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज ठेवल्याने युतीत, तर अपक्ष मधुकर तळपाडे व मारुती मेंगाळ यांनी माघार न घेतल्याने आघाडीत बंडखोरी झाली आहे. सुरुवातीला दुरंगी-तिरंगी होईल, असे वाटणारी निवडणूक आता बहुरंगी होत आहे.

# जिल्ह्यात ३० नोव्हेंबरला लोक अदालत

## प्रधान जिल्हा न्यायधीश शेंडे यांची माहिती

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर व औरंगाबाद येथे प्रलंबित असलेले खटले नगर मधून (ऑनलाईन) पद्धतीने विशेष लोकअदालतीत तडजोडीने मिटवण्याची संधी राज्य विधी सेवा प्राधिकरणाने उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर व औरंगाबाद येथे ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०२४ रोजी विशेष लोक अदालत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी दिली.**



या विशेष लोकअदालतीमध्ये मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथे प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत.

या लोकअदालतीत पक्षकार प्रत्यक्ष अथवा (ऑनलाइन) पद्धतीने सहभागी होऊ शकतात. त्यासाठी त्यांनी उच्च न्यायालयाच्या संबंधित विधिज्ञांनी कल्पना द्यावी, अथवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय नगर अथवा तालुका विधी सेवा समिती संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, नेवासा, श्रीगोंदा, राहता, राहुरी, पाथर्डी, शेवगाव, पारनेर, कर्जत, जामखेड, अकोले यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे

## अरूण उंडे यांचे आवाहन

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत असून सर्व घटकातील पात्र मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन नेवासा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अरूण उंडे यांनी केले.**

नेवासा तहसील कार्यालयात आयोजित 'लोकशाही महोत्सवाची दिवाळी' या उपक्रमात ते बोलत होते. अधिकारी-कर्मचारी पारंपरिक वेशभूषेत या उपक्रमात सहभागी झाले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून मतदार जागृती करण्यात आली. याप्रसंगी परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी विशाल यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय बिरादार, मुख्याधिकारी सोनाली म्हात्रे, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, निवडणूक नायब तहसीलदार किशोर सानप आदी उपस्थित होते.




## वाचकांच्या लेखणीतून

# आदर्श वृत्तपत्रीय मृत्युलेख लिहिणारे संपादक : श्रीपाद शंकर नवरे

वृत्तपत्रांत महान व्यक्तींचे मृत्युलेख प्रकाशित होत असतात. ते लेख प्रभावी तर असावेतच; पण त्याचबरोबर तत्सम व्यक्तीच्या जीवनाचे सार त्या लेखांत उतरणे अपेक्षित असते. मग ती व्यक्ती राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक वा आर्थिक क्षेत्रातली असो. मराठी वृत्तपत्रसृष्टीत श्रीपाद शंकर नवरे (मृ.१९५९) यांची सुंदर मृत्युलेख लिहिण्यासाठी ख्याती होती. ते उच्च कोटीचे पत्रकार असून १९२९ साली आरंभ झालेल्या प्रभात दैनिकाचे ते पहिले संपादक होते. त्यांनी सेनापती बापटांचे सेनापती नामक चरित्र लिहिले आहे. आलो याचि कारणासी हे त्यांच्या निवडक अग्रलेखांचे पुस्तकही मी वाचले आहे.

सुंदर मृत्युलेख लिहिण्याची नवरे यांची ख्याती पाहून आचार्य अत्रेही प्रभावित झाले होते. आचार्य हयात असताना माझ्यावरचा मृत्युलेख लिहून दाखवा म्हणून त्यांनी नवरे यांच्यापुढे प्रस्ताव ठेवला होता! मी १९८४ साली मुंबईच्या एसएनडीटी महाविद्यालयात पत्रकारिता शिकत असताना आमचे गुरू रामकृष्ण ऊर्फ तात्यासाहेब बाक्रे यांनी ही घटना आम्हा विद्यार्थ्यांना सांगितली होती.



# लाडक्या बहिणींना २१०० रुपये, तर शेतकऱ्यांना वार्षिक १५ हजार रुपये!

## महायुतीचा जाहीरनामा प्रसिद्ध | एमएसपीवरही देणार २० टक्के अनुदान

कोल्हापूर : प्रतिनिधी

महायुतीने मंगळवारी कोल्हापुरातून प्रचाराचा नारळ फोडला आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचा दहा कलमी जाहीरनामा देखील सादर केला आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, या सभेने महाराष्ट्रातल्या इतिहासातील नवा अध्याय लिहिला जाणार आहे. १९९५ मध्ये युतीचा प्रचाराचा पहिला नारळ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी कोल्हापूरमध्ये फोडला, आई आंबाबाईच्या आशीर्वादाने. २०१४ साली देखील प्रचाराचा श्रीगणेशा इथूनच झाला आणि इतिहास घडला. २०२४ साली देखील याच करवीरनगरीमधून प्रचाराची सुरुवात होत आहे.

**महायुती जाहीरनामामधील १० कलम**

लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे जाहीर करत आहोत. महिला सुरक्षेसाठी २५०० हजार महिलांना पोलिस दलात भरती करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्राच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्याचा आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करत आहोत तसेच शेतकरी सन्मान योजना जी आहे पंतप्रधानांची त्याचे ६००० आणि आपले ६०००, एकूण १२ हजार जी आहे, ती १२ हजार वर्षाला १५ हजार करण्याचा निर्णय घेतला आहे. एमएसपीवर २० टक्के अनुदान देण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे



या राज्यात कोणीही उपाशी झोपणार नाही. प्रत्येकाला अन्न आणि निवारा देण्याचे वचन आम्ही देत आहोत.

वृद्ध पेन्शनदार कामना योजना १५०० वरून २१०० रुपये देण्याचे वचन आम्ही देत आहोत.

जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

२५ लाख रोजगार निर्मिती, १० लाख विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४५ हजार गावात पांदण रस्ते बांधणार

अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये आणि विमा सुरक्षाकवच देण्याचा निर्णय घेतला आहे.

वीजबिलात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात सौर आणि अक्षय उर्जेवर भर देणार आहोत.

व्हीजन महाराष्ट्र २०२९ हे १०० दिवसांच्या आत सादर करण्याचे वचन या १० कलमी कार्यक्रमात आहे.

दरम्यान, यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी देखील महाविकास आघाडीवर तसेच उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोल्हापूर उत्तरेतून पंजा गायब आणि पश्चिमेतून देखील करायचा आहे. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी पुन्हा आशीर्वाद मिळू दे. कोल्हापुरातून सुरुवात केली की विजय मिळतोच मिळतो. उद्धव ठाकरे या ठिकाणी आले होते. ते म्हणाले की महाराजांचा इंग्रजांवर राग होता म्हणून सुरत लुटली. तुम्हाला आता औरंगजेबाचं नाव घ्यायला लाज वाटू लागली. हिंदुहृदयसम्राट नाव बाळासाहेबांच्या नावापुढचे काढून टाकले, अशी खोचक टीका फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.

# कोरठण देवस्थान संदर्भात ११ नोव्हेंबरला सुनावणी

## धर्मादाय उपायुक्तांकडून विश्वस्तांना नोटीसा जारी

**पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी**

**येथील कोरठण खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या घटना दुरुस्तीसंदर्भात ११ नोव्हेंबरला सुनावणी होणार असून यासंदर्भात उपायुक्तांनी विश्वसतांना नोटीसा जारी केल्या आहेत.**

नगर-कोरठण खंडोबा देवस्थान लाखो भाविक भक्तांचे कुलदैवत आणि श्रद्धास्थान असून राज्यस्तरीय''ब''वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.सदर देवस्थान ट्रस्टच्या घटनेत विश्वस्त नेमणुकीचे नियम,पात्रता,पद्धती बाबत नियमावली आणि देवाचे मानकरी खरे भक्त,ग्रामस्थ,मूळ मंदिराचे निर्माण करणाऱ्यांचे वारस यांच्यासाठी विश्वस्त पदाच्या जागा निश्चित करून घटनेतील कलमांमध्ये तशी दुरुस्ती करण्यात यावी. असा प्रस्ताव खंडोबा भक्त गोरख जगताप,संभाजी जगताप,जनजी खोसे,गोपाळा घुले आणि संकल्प विश्वासराव (बेल्हे) यांनी धर्मादाय उपायुक्त अहिल्यानगर (अहमदनगर) यांचेकडे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० कलम ५० अ (३)नुसार देवस्थानचे भक्त व हितसंबंधी व्यक्ती म्हणून दाखल केलेला आहे.

त्यावर धर्मादाय उपायुक्त श्रीमती उषा पाटील यांनी देवस्थानच्या सर्व विश्वस्तांना दिनांक २८/१०/२०२४ रोजी नोटीसा जारी करून दिनांक ११ नोव्हेंबरला होणाऱ्या सुनावणीस उपस्थित राहणेस व म्हणणे देणेस आदेश केलेले आहेत. श्री खंडोबा भक्त गोरख जगताप,श्री संकल्प विश्वासराव (बेल्हे) यांनी सन २०२३ सालात देवस्थान ट्रस्ट विश्वस्तांना लेखी अर्ज देऊन घटनेत दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. परंतु देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी,विश्वस्त यांनी त्याबाबत काहीही निर्णय केला नाही.देवस्थान ट्रस्टची मूळ घटना धर्मादाय आयुक्त यांनी सन १९९१ सालात तयार करून मंजूर केलेली आहे. त्यानुसार देवाचे भक्त व हितसंबंधी व्यक्ती म्हणून सदरची घटना दुरुस्तीचा प्रस्ताव नियमानुसार धर्मादाय उपायुक्त यांच्या न्यायालयाकडे दाखल करण्यात आलेला आहे.




सदर देवस्थानच्या सन २०२२ साली,झालेल्या विश्वस्तांच्या नेमणुका राजकीय दबावाखाली झाल्यामुळे देवाचे मानकरी,देवस्थान मध्ये सेवा,भक्तीभाव, योगदान असणारे अर्जदार यांना निवड करण्यात आले नाहीतम्हणून भाविकांमध्ये नाराजी आहे.बेल्हे गावचे मानकरी यांना विश्वस्त पदावर निवड केले नाही.त्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलन बहिष्कार करून निषेध नोंदवला होता.

देवी एकवीरा देवस्थान लोणावळा या ट्रस्टच्या विश्वस्त निवडीला मुंबई उच्च न्यायालयाने लागू केलेली नियम नियमावली कोरठण खंडोबा देवस्थानच्या विश्वस्त मंडळ निवडीत लागू करण्यासाठी सदरच्या प्रस्तावातून ट्रस्टच्या घटनेत नवीन नियम व निवड पद्धतीची तरतूद दिली आहे. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टची घटना दुरुस्ती बाबतच्या सदर प्रस्तावावर ट्रस्टचे विश्वस्त मंडळ आता धर्मदाय आयुक्त न्यायालया पुढील सुनावणीत काय भूमिका घेणार,आणि धर्मादाय उपायुक्त या प्रस्तावातील नमूद घटनादुरुस्ती बाबत अंतिम निर्णय काय देतील याकडे सर्व भाविक भक्त,मानकरी यांचे लक्ष लागले आहे.

# शरद पवारांनी दिलेला मंत्र आता प्रत्यक्षात !

## देवेंद्र फडणवीस यांचं वक्तव्य चर्चेत

**कराड : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कऱ्हाड या ठिकाणी एक सभा घेतली. या सभेत त्यांनी शरद पवारांनी दिलेल्या मंत्राचा उल्लेख केला. उत्तर कऱ्हाडमध्ये भाकरी फिरणार असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. त्यांच्या याविधानाची चर्चा रंगली आहे.**



**काय म्हणाले आहेत देवेंद्र फडणवीस?**

''कऱ्हाडची भूमी ही ऐतिहासिक आहे. या इतिहासात महाराष्ट्राची जडणघडण आहे. मात्र मागची २५ वर्षे ज्या विकासाची अपेक्षा ठेवतं, जे परिवर्तन व्हायला हवं तसंच वारंवार लोकप्रतिनिधी पाठवतो. मात्र कऱ्हाडमध्ये परिवर्तन होईल.'' असंदेवेंद्र फडणवीसयांनी म्हटलं आहे. आता सगळ्यांनी मिळून ठरवलं की मनोज दादाला उमेदवारी द्यायची. उत्तर कऱ्हाडच्या जबरदस्त परिवर्तनाचा चेहरा मनोज घोरपडे आहेत. हा सगळा कृष्णेकाठचा भाग ज्या भागांत अनेक नद्यांचा उगम होतो. ज्या भागाने महाराष्ट्राला पाणीदार केलं अशा ठिकाणीही आपल्याला दुष्काळ दिसतो. २०१४ ते २०१९ या कालावधीत दुष्काळाविरोधात आपल्याला काम करता आलं. सगळ्या योजनांना मोठ्या प्रमाणात निधी देऊन दुष्काळी भागांचा चेहरा बदलण्याचं काम आपण केलं. असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**मनोज घोरपडेंना विजयी करण्याचं आवाहन**

मनोज घोरपडेंना विजयी करा, १०० मीटरचं हेड करुन देतो आणि प्रत्येक ठिकाणी पाणी पोहचवण्याचा शब्द हा देवाभाऊ तुम्हाला देतो आहे. आज विरोधी पक्षात असतानाही कऱ्हाड उत्तर साठी १ हजार कोटी रुपयांचा निधी आणला. विरोधी पक्षात राहून जर इतका निधी आणला तर कमळ फुलल्यानंतर आपण किती निधी आणू शकतो विचार करा असंही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. पाच वर्षांत आपण २५ वर्षांचा बॅकलॉग भरुन काढू. काही कमी पडलं तर उदयन महाराजे आहेत. महाराजांच्या एका म्हणण्यावर मोदीजी तिजोरी खुली करतील तुम्ही चिंताच करु नका असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**शरद पवार यांचा मंत्र आम्हाला उपयोगी पडला**

महाराष्ट्रातले ज्येष्ठ नेतेशरद पवारहे आमचे राजकीय विरोधक आहेत. मात्र विरोधकांनीही चांगली गोष्ट सांगितली तर त्या गोष्टीचा अवलंब आपण केला पाहिजे. मागच्या काळात राजकाणाबाबत बोलत असताना शरद पवार असं म्हणाले होते की तव्यावरची भाकरी वेळेवर फिरवली नाही तर ती करपते. आता शरद पवारांना सांगा उत्तर कऱ्हाडमधली तुमची भाकरी फिरवायची वेळ आली आहे. नाहीतर आमचं उत्तर कऱ्हाड करपल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे शरद पवारांनी दिलेल्या मंत्राप्रमाणे उत्तर कऱ्हाडकर भाकरी फिरवणार आहेत. मनोजदादाला मुंबईच्या विधानसभेत पोहचवणार आहे. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# रेणावीकर विद्यामंदिर च्या २००२-०३ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात

**नगर : प्रतिनिधी**

सावेडी परिसरात असलेली रेणावीकर विद्यामंदिर शाळेतील २००२ ते २००३ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मेळावा आयोजित करण्यात आले होते.

माजी विद्यार्थी एकत्र आणण्यासाठी व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून मित्र जोडले गेले सर्व मित्र-मैत्रिणी माजी विद्यार्थिनी यांनी येथे भेट देऊन स्नेह मेळाव्याचे प्रारंभ केले शाळेची शिस्त व झालेल्या शैक्षणिक संस्कारामुळे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली तसेच शाळेचे ऋण देखील व्यक्त केले लहानपणीचे मित्र मैत्रिणी २१ वर्षांनी एकत्र आले त्यामुळे सर्वांना आनंद झाला व यावेळी या समितीचे अध्यक्ष अशोक मासाळ, मार्गदर्शक निखिल आरु, यांनी वेगवेगळ्या कमिटी नेमूण कमिटी मेम्बर निखिल लकारे, विकास कांडेकर, सुजाता शिंदे, पल्लवी दीकोंडा, अमोल चेमटे , विजय कोतकर, क्षितिजा होशीग, पल्लवी आघाव विघ्ने, अमोल कांडेकर यां मित्र-मैत्रिणींनी एकत्र येत आपल्या वर्गातील मित्र-मैत्रिणींचा स्नेह मेळावा घेण्याचे ठरवले व ९० मित्र-मैत्रिणी स्नेह मेळावासाठी एकत्र केले त्यासाठी खुप मेहनत यांनी घेतली व या शाळेतील अनेक विद्यार्थी आज भारतातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या चांगल्या पदावर कार्यरत आहे.



धावपळीच्या जीवनात आपण खूप व्यस्त झालो आपले बालमित्र मागे राहिले एकदा शाळा संपली आणि सगळे पक्षी आकाशात उडून गेले ह्याच पक्षांना एकत्रित आणण्याची मुठ बांधली गेली व सगळे एका छताखाली आज २१ वर्षानंतर आले एकमेकांना भेटून आनंद झाले. व आपल्यातील लहानपणीचे काही मित्र-मैत्रिणी हे दिवंगत असलेले त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

व दरवर्षी असेच एकत्र येणार असल्याचा निर्धार व्यक्त केला व आपल सामाजिक दायित्व निभावण्यासाठी एकमेकांची मदत घेत अनेकांना आधार देण्यासाठी कायम तत्पर राहण्याचा संकल्प केला या स्नेह मेळाव्याचे सूत्रसंचालन प्रियांका शेळके, बोबडे पाटील यांनी केले प्रास्ताविक पल्लवी दिकोंडा, निखिल लकारे यांनी, विकास कांडेकर, पल्लवी आघाव, विघ्ने यांनी सांभाळल्या आभार प्रदर्शन अशोक मासाळ यांनी केले.

# सिव्हिल हाडको परिसरात मोठी विकास कामे

## ■ सतीश बारस्कर यांच्याकडून आ. संग्राम जगताप यांचे कौतुक
## ■ जि प  सदस्य सचिन जगताप यांचा नागरिकांशी संवाद

**नगर : प्रतिनिधी**

**सिव्हील हाडको पसिरात गेल्या दहा वर्षात आमदार संग्राम जगताप यांनी मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावली असून त्यामुळेच त्यांच्या प्रचार फेऱ्यांना ठिकठिकाणी नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे मा. नगरसेवक सतीश बारस्कर यांनी सांगितले.**

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ सिव्हील हाडको परिसरात जिल्हा परिषदेचे मा. सदस्य सचिन जगताप यांनी विकास यात्राच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी बारस्कर यांनी आ. जगताप यांनी या परिसरात केलेल्या विकास कामांची माहिती दिली.
बारस्कर म्हणाले, या परिसरातील प्रलंबित विकास कामांसाठी आ. संग्राम जगताप यांनी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिला. विविध योजनांमधून अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत. गणेश चौक ते मिस्कीन मळा रस्त्याची अवस्था अत्यंत दयनिय झाली होती. या रस्त्याचे कामही सुरू झाले असून नागरीकांच्या दळणवळणासाठी महत्वाच्या असलेल्या या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यात आ. जगताप यांना यश आले आल्याचे बारस्कर म्हणाले.

यावेळी गजेंद्र भांडवलकर, शिवाजी डोके, काका शेळके, आनंद लहामगे, दिलीप कटारिया, विशाल म्हस्के, रोहन धुप्पड, अजय रंगलानी, किरण पिसोरे, अरूण खरात, प्रमोद पागीरे, अनिरूध्द भोर, सचिन जगताप, संकेत पुजारी, जय दिघे, यश कांडेकर, किरण बारस्कर, नमन महांकले, प्रशांत पगारे, शुभम भोसले, विजय काकडे, पराग महांकाळ, अजय भोसले, अभि भांडवलकर,विजय ठोंबरे यांच्यासह नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.



■ सिव्हील हाडको परिसरात आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या विकास यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### पुष्पवष्टी करत स्वागत

शहराच्या विविध भागांप्रमाणेच सिव्हील हाडको परिसरातही आ. जगताप यांच्या विकास यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. माता-भगिनींनी औक्षण करीत, पुष्पवष्टी करीत आशीर्वाद देत सिव्हिल हाडको परिसर आ. संग्राम जगताप यांना मतरूपी आशीर्वाद देणार असल्याची ग्वाही नागरीकांनी दिली.

### नागरीकांच्या उत्साहाने मन भारावले

सध्या विधानसभेची निवडणूक प्रक्रिया सुरू असून प्रचारानिमित्त प्रभागांमध्ये प्रचाराच्या निमित्ताने फिरताना मोठया उत्साहात विकास यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे. नागरीकांचा उत्साह पाहून मन भाराऊन जात आहे. आ. संग्राम जगताप यांनी केलेल्या कामाची ही पावती आहे.

सचिन जगताप
मा. जिल्हा परिषद सदस्य

### शहराचा कायापालट होतोय

शहर विकासाचे पाहिलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी पाहिलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी मोठा निधी मंजुर करून आणला. शहराच्या विविध भागांमध्ये विकासाची कामे सुरु केली. त्या माध्यमातून शहराचा कायापालट होताना दिसत असल्याचे जि प चे मा. सदस्य सचिन जगताप यांनी सांगितले.

### भावी मंत्री !

सिव्हिल हाडको परिसरात आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या विकास यात्रेचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. काही युवकांनी विश्वास जुना, संग्राम भैयया पुन्हा अशी टॅगलाईन करत भावी मंत्री म्हणून आ. संग्राम जगताप यांचा फलकांवर उल्लेख करण्यात आला होता.

# श्रीकांत शेवाळे यांची प्रसादालयासाठी देणगी

## मळगंगा देवस्थान ट्रस्टच्या वतीने सत्कार


■ श्रीकांत दत्तात्रय शेवाळे यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित प्रसादालयाला दहा हजार देणगी दिल्याबद्दल वसंत कवाद यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

**निघोज : प्रतिनिधी**

**सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत दत्तात्रय शेवाळे यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित प्रसादालयासाठी दहा हजार रुपये देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, माजी सरपंच व विश्वस्त ठकारामशेठ लंके, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, विश्वस्त बबनराव ससाणे आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक भिवाशेठ रसाळ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोजचे मुख्य समन्वयक दत्तात्रय उनवणे, ट्रस्ट व्यवस्थापक महेश ढवळे आदी उपस्थित होते.

श्रीकांत शेवाळे हे संगमनेर येथे स्थायिक असून त्यांचे जन्मगाव निघोज आहे. मळगंगा देवीचा यात्रा उत्सव किंवा दसरा उत्सव यामध्ये शेवाळे कुटुंबाला पालखी सोहळ्यात अब्दागीरीचा मान आहे. श्रीकांत शेवाळे यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून सामाजिक, धार्मिक शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांची शैक्षणिक सेवा बहुतांश वर्षे संगमनेर तालुक्यात झाली असून पंढरपूर पायी वारीसाठी त्यांनी अनेक भक्तगण संघटीत करीत त्यांनी जवळपास चाळीस वर्षे पायी दिंडी सोहळ्यात सहभागी होऊन पांडुरंगाची सेवा केली आहे.

प्रसादालयासाठी त्यांनी दहा हजार रुपये देणगी दिल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कोष्टी समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष बबनराव ससाणे, उपाध्यक्ष गोकुळशेठ ढुमणे, कोष्टी समाज मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक कचरदास उनवणे, बाळासाहेब ढुमणे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# कार्यकारी अभियंता सुजित अमृतकर यांचा सत्कार

## निघोजच्या जगप्रसिद्ध रांजणखळग्यांना भेट



**निघोज : प्रतिनिधी**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता सुजित अमृतकर यांनी जगप्रसिद्ध रांजणखळगे येथे भेट दिली. तसेच राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिकेला भेट दिली तसेच ट्रस्ट कार्यालयात त्यांचा ट्रस्ट वतीने सत्कार करण्यात आला.**

बबनराव ससाणे, म सुनिल पवार,  मंगेश लाळगे, सौरभ उनवणे,  दत्तात्रय लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी त्यांचा संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन  वराळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संदेश लंके,  सुनिल उचाळे, विलासराव हारदे, दुतारे मामा,  संतोष शेटे, अस्लमभाई इनामदार, दत्तात्रय लंके आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सुजित अमृतकर यावेळी म्हणाले मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान आहे. देवीची महती संपूर्ण राज्यात  देवीचे दर्शन घेण्यासाठी मुद्दामहून निघोजला आलो आहे.यानिमित्ताने जगप्रसिद्ध रांजणखळगे पाहण्याचा योग मला आला आहे. देवीचे जागृत देवस्थान व जगप्रसिद्ध रांजणखळगे हे दोन्ही स्थाने या ठिकाणी आहे हे परमभाग्य आहे यासाठी आपण सामाजिक योगदान देणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

संदेश लंके यांनी सांगितले की अमृतकर हे एक कार्यक्षम अधिकारी म्हणून परिचित असून जगप्रसिद्ध रांजणखळगे पर्यटन स्थळ व मळगंगा देवीचा महिमा त्यांना माहीत असल्याने गेली अनेक दिवसांपासून त्यांनी या ठिकाणी येण्याचा प्रयत्न केला मात्र देवीचा आशीर्वाद असल्याने ते आले व त्यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन तसेच पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांच्या वतीने सत्कार स्विकारला हा आमचा निघोज ग्रामवासियांचा बहुमान असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय लंके यांनी केले शेवटी बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

# टाकळीच्या युवकांचा राणी लंके यांना पाठींबा

## खा. नीलेश लंके यांनी केले राष्ट्रवादीत स्वागत

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर येथील युवकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार केला असून टाकळी ढोकेश्वर गावामध्ये सर्वाधिक आघाडी देण्याची ग्वाही या युवकांनी खा. नीलेश लंके यांना दिला. या युवकांचा खा. नीलेश लंके यांनी पारनेर येथील संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये स्वागत केले.**

टाकळी ढोकेश्वरचे विद्यमान उपसरपंच रामभाऊ तराळ यांच्या नेतृत्वाखाली या युवकांनी खा. नीलेश लंके यांची भेट घेऊन राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. खा. नीलेश लंके यांनी ते आमदार म्हणून काम करताना साडेचार वर्षात मोठया प्रमाणावर विकास कामे माग लावली आहे.१ हजार ६०० ते १ हजार ७०० कोटींची विक्रमी कामे माग लागल्याने तालुक्यातील प्रत्येक गावात विकासाची गंगा पोहचली असून विकासाची ही घोडदौड अशीच सुरू ठेवण्यासाठी राणी लंके यांना पाठबळ देणे, त्यांना विक्रमी मताधिक्य मिळावे यासाठी आपलाही खारीचा वाटा असावा या हेतूने आम्ही कोणत्याही अटी, शत न ठेवता लंके यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतल्याने या युवकांनी सांगितले.


■ टाकळी ढोकेश्वर येथील युवकांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करून राणी लंके यांच्या विजयासाठी परीश्रम घेण्याची ग्वाही दिली.

### या युवकांनी केला राष्ट्रवादीत प्रवेश

किरण अल्हाट, दिनेश वैराळ, अक्षय आल्हाट, यौव्हान गायकवाड, योगेश म्हस्कुले, संतोष गायकवाड, सुशांत साळवे, बच्चा गायकवाड, संकेत साळवे, मुन्ना अल्हाट, सदू आल्हाट, अक्षय साळवे, ऋषीकेश आल्हाट, विशाल साळवे, विशाल गवारी, अमोल अल्हाट, बाळू आल्हाट, बबलू अल्हाट, अनिकेत आल्हाट, संतोष जाधव, चेतन पाडळे, वैभव गायकवाड, निवत्ती अल्हाट, बाळू पवार, सुरज झावरे, प्रशांत साळवे, संकेत झावरे, करण वैराळ, मंगेश वैराळ, भैय्या गोरख सौदागर, संदीप माकरे, दादू शेख, राहूल अल्हाट, सोनू साळवे, सिध्देश म्हस्कुले, शाम आल्हाट.

### युवकांचे प्रश्न माग लावू

टाकळी ढोकेश्वर येथील युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. या युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण पुढाकार घेऊन ते मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू. मतदारसंघातील विविध गावांमध्ये आपणास भरघोस पाठींबा मिळत असून जनतेकडून मिळत असलेल्या भरभरून प्रेमामुळे मी भारावून गेले आहे.

राणी नीलेश लंके
उमेदवार, महाविकास आघाडी

### युवकांचा सन्मान, रोजगारासाठी प्रयत्न

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात या युवकांनी प्रवेश केल्यानंतर त्यांचा सन्मान जपला जाईल. त्यांच्या रोजगारासाठी प्रयत्न केले जातील. पारनेर-नगर मतदारसंघातील विविध गावांमधील पदाधिकारी, तरूण, ज्येष्ठ मंडळी महाविकास आघाडीच्या पाठीशी एकमुखी उभे राहत असून राणी लंके या विक्रमी मतांनी विजयी होतील. मतदारांनी दिलेल्या संधीचे त्या आपल्याप्रमाणेच सोने करतील.

खा. नीलेश लंके

# ढोल ताशांचा गजर, पुष्पवष्टी अन् महिलांकडून औक्षण!

## आ. संग्राम जगताप यांच्या प्रचार फेऱ्यांना प्रतिसाद

**नगर : प्रतिनिधी**

**महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ विकास यात्रेच्या माध्यमातून काढण्यात येत असलेल्या प्रचार फेऱ्यांना प्रत्येक प्रभागात उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. ढोल ताशांचा गजर, पुष्पवष्टी आणि महिलांकडून औक्षण करीत नागरिकांकडून आ. जगताप यांचे स्वागत करण्यात येत आहे.**

आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ काढण्यात येत असलेली विकास यात्रा मतदारांशी सुसंवाद साधत प्रभाग क्र. ५ मध्ये पोहचली. भिस्तबाग चौक, श्रमिकनगर, बालाजी मंदिर, शिवकृपा कॉलनी, वैदूवाडी, कुष्ठधाम रोड, सोनानगर, नवीन प्रेमदान हाडको या उपनगरांमध्ये प्रचार फेरी काढण्यात आली. या सर्व प्रभागांमध्ये महायुतीचे उमेदवार आ. जगताप यांच्या प्रचार फेऱ्यांना मतदारांचा उत्सफुर्त प्रतिसाद पहावयास मिळाला.



प्रचार फेरीचा शुभारंभ भाजपाचे विधानसभा निवडणूक प्रमुख भैय्या गंधे यांच्या उपास्थितीत झाला. यावेळी मा नगरसेवक मनोज दुल्लम, सोनाबाई शिंदे, उदय कराळे, सतिश शिंदे, अजिंक्य बोरकर, शिवसेनेचे काका शेळके, सतिश बारस्कर, नितीन शेलार, सचिन जगताप, बाळासाहेब निकम, सुमित कुलकण, किरण बारस्कर, जय दिघे, सुरज वाकळे, गजू भांडवलकर, नमन महांकाळ, सुरज शिंदे, राहुल शिंदे, शिवाजी शिंदे, अजिंक्य पानसंबळ, गौरव पाटोळे, अमित वाघमारे, पियुष मनोचा, योगेश ठुबे, शिवाजी डोके, विशाल म्हस्के यांच्यासह भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी या प्रचार फेरीस उपस्थित होते.

### शहराची वाटचाल विकासाच्या दिशेने

आपल्या शहराची वाटचाल आता वेगाने विकासाच्या दिशेने होत आहे. शहर व उपनगरातील सर्व भागांमध्ये मोठया प्रमाणात विकास कामे प्रगतीपथावर आहेत.  उत्सफुर्तपणे स्वागत करीत आपण केलेल्या कामांचे समाधान व्यक्त करीत आहेत. मतदारांचा प्रतिसाद पाहता ही निवडणूक जनतेनेच हाती घेतली आहे.

आमदार संग्राम जगताप
विधानसभा सदस्य


# पारनेर तालुकाध्यक्षपदी रमेश गवळी

## अखिल महाऑनलाईन व आधार सेवा असोसिएशनची निवड

**सुपा : प्रतिनिधी**

**अखिल स्तरीय महाऑनलाईन व आधार सेवा असोसिएशनच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी रमेश हरिभाऊ गवळी तर उपाध्यक्षपदी राजेंद्र बाळासाहेब म्हस्के यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अजिज शेख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी रमेश गवळी, उपाध्यक्षपदी राजेंद्र म्हस्के, सचिव दत्तात्रय काकडे, कार्याध्यक्ष संदीप संसारे आदींची निवड करण्यात आली. निवडीनंतर शेख यांनी पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र दिले. दरम्यान रमेश गवळी यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत केले जात आहे.



### समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार

संस्थापक अध्यक्ष अजिज शेख यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता भविष्यात महाराष्ट्रातील महाऑनलाईन केंद्र (सेतु केंद्र) संचालकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

रमेश गवळी
नवनिर्वाचित अध्यक्ष

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com